जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २७.०२.२०२५**

३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे २०२५

आज दिनांक २७/०२/२०२५ रोजी पोलीस क्रीडा संकुल, ठाणे शहर येथे ३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५ चा उद्घाटन सोहळा मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांच्या हस्ते मोठया दिमाखात पार पडला. सदर उद्घाटन सभारंभ कार्यक्रमाला मा.ना.श्री.प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री,महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री.योगेश कदम, गृह राज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, शासकीय अधिकारी, नागरिक व पत्रकार उपस्थित होते.

मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांनी उद्घाटनपर भाषणात सर्व खेळाडुंना शुभेच्छा दिल्या तसेच पोलीस दलामध्ये उत्तमोत्तम खेळाडु तयार होण्यासाठी व त्यांना नियमित सराव करण्यासाठी पोलीस ग्राउंडवर सिंथेटिक ट्रॅक व हाय मास्ट उभारणार असल्याचे देखील घोषित केले. सदर सुविधेमुळे खेळाडुंना जास्तीत जास्त सराव करणे सोयीस्कर होईल जेणेकरून खेळाडुंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेता येईल असेही त्यांच्या भाषणात नमूद केले. या दरम्यान मा. उपमुख्यमंत्री यांनी अशी शेरो-शायरी करून उ **''तुफानों मे ताश का घर नही बनता, रोने से बिगडा मुकद्दर नहीं बनता, दुनिया को जितने का हौसला रखो मेरे दोस्त, एक हार से कोई फकीर और एक जीत से कोई सिकंदर नही बनता''** अशी शेरो-शायरी करून उपस्थित पोलीस खेळाडुंचे मनोबल वाढविले. सदर कार्यक्रमादरम्यान स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व १६ संघानी उत्कृष्ठ संचलन करून मुख्य अतिर्थींना मानवंदना देवून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर